प्रसिद्धी पत्रक

**मिरा भाईंदर महानगरपालिकेचा 'वन क्लिक अटेंडन्स' सॉफ्टवेअरचा वापर**
**कर्मचाऱ्यांना वेतन जलद आणि अचूक वेतन,**

**मिरा-भाईंदर, ३१ डिसेंबर २०२४** : मिरा भाईदर महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वेतन वेळत मिळावे आणि त्यांच्या हजेरीचे तसेच रजेचे योग्य व्यवस्थापन व्हावे यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने 'वन क्लिक अटेंडन्स' हे सॉफ्टवेअर वापरात आणले आहे. या प्रणाली मध्ये कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची दैनंदिन हजेरी नोंदवली जात आहे. यामुळे कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी, गैरहजेरी आदींची संगणकीय नोंद व्हावी तसेच त्याचा तपशीलवार आढावा तयार होत आहे. या सॉफ्टवेअर मध्ये कर्मचाऱ्यांच्या वार्षिक रजा किती शिल्लक आहेत त्याची माहिती मिळते आणि सुटी मंजूर करुन वेतन काढणे सोपे होत आहे व माहे डिसेंबर-2024 चे वेतन वन क्लिक अटेंडन्स' नुसार काढण्यात आलेले आहे. यापुढेही अधिकारी/कर्मचारी यांचे मासिक वेतन वन क्लिक अटेंडन्स' नुसार काढण्यात येणार आहे.

मिरा भाईदर महापालिका अद्ययावत होण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे जात आहे. यामुळेच महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या तसेच व्यवस्थापनाच्या सोयीसाठी 'वन क्लिक अटेंडन्स' सॉफ्टवेअरचा वापर सुरू केला आहे. या सॉफ्टवेअरसंबंधी कर्मचाऱ्यांना कोणतीही शंका असल्यास किंवा न समजल्यास याबाबत माहिती आणि प्रशिक्षणही देण्यात आले आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी दिली आहे.

**कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचा लाभ त्याच दिवशी**

मिरा भाईदर महानगरपालिकेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवाकाळातील सेवा उपदान, रजा रोखीकरण, निवृत्तीवेतनाचा अंशराशीकरण आदी विविध लाभ देण्यात येतात. मात्र यासाठी विलंब लागत होता. सेवानिवृत्तीनंतरही कर्मचारी आपल्या हक्काच्या पैशांसाठी पालिकेत फेऱ्या माराव्या लागत होत्या. यासाठी महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी दर महा सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवाविषयक सर्व लाभ सेवानिवृत्तीच्या दिनांकास देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीचे लाभ मिळवून देण्यासाठी आधीपासूनच प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. डिसेंबर महिन्यात सुरेश जयवंत म्हात्रे (वाहनचालक) आणि विनोद बाळकृष्ण शिंदे (शिपाई) हे सेवानिवृत्त झाले आहेत. या दोन्ही कर्चमाऱ्यांचे सेवाविषयक सर्व लाभ सेवानिवृत्तीच्या दिवशीच देण्यात आले आहे.